नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५० Issue - 50 | वार रविवार दि. ६ जुलै २०२५ Blow- Sunday Date 6 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पाच वर्षात कृषी क्षेत्रात २५ हजार कोटींची गुंतवणूक करणार

## शेतीची उत्पादकता वाढविण्यावर शासनाचा भर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; पंढरपूर येथे 'कृषी पंढरी' कृषी प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शेतकऱ्याला शेती फायद्याची व्हावी यासाठी उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढावी असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आगामी काळात शेतीच्या सर्व फिडरचे सौरऊर्जिकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून या योजनेत महाराष्ट्रात सोलापूर जिल्हा प्रथम असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित 'कृषी पंढरी' कृषी प्रदर्शनाच्या उद्धाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, आमदार विजय देशमुख, आमदार रणजीत मोहिते पाटील, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, विभागीय कृषी सह संचालक दत्तात्रय गावसाने आदी उपस्थित होते.

उत्पादन खर्च कमी होणे आणि उत्पादकता वाढावी यासाठी राज्य शासन अनेक योजना राबवित आहे , असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत गाव हा घटक धरून जलसंधारण, जलनियोजन पासून शेतीच्या यांत्रिकीकरणापासून बाजारसाखळी तयार करण्यापर्यंत पिकाचे एकात्मिक व्यवस्थापन अशा सर्व बाबी गावात पूर्ण करून गावातला छोट्यातला छोट्या शेतकऱ्याला सर्व शासकीय योजनांचा लाभ होईल असा प्रयत्न करण्यात आला आहे. नुकतेच पिक विमा योजना सुधारित केली आहे.

श्री.फडणवीस पुढे म्हणाले, शेतीच्या क्षेत्रात यावर्षीपासून येत्या ५ वर्षात दरवर्षी ५ हजार अशी २५ हजार कोटी रुपये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ठिबक संच, कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, पंप आदी देण्यात येणार असून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. गतकाळात निर्णय घेतल्याप्रमाणे साडेसात अश्वशक्ती पर्यंतच्या कृषीपंपांचे वीजबिल आकारले जात नाही.



पांडुरंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी, शेतकऱ्यांना शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान आणि योजनांची लहान व मोठ्यातल्या मोठ्या शेतकरी अशा सर्वांना त्यांचा लाभ घेण्याची माहिती मिळावी यासाठी कृषी प्रदर्शन भरवावे अशी अपेक्षा सुधाकरपंत परिचारक यांनी २०१५ साली व्यक्त केली होती. तेव्हापासून दरवर्षी हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. यामध्ये शासनाचे विविध विभाग, कृषी विद्यापीठे यांचे स्टॉल, विविध योजना, वेगवेगळ्या व्यावसायिकांनी आणि शेतकऱ्यांनी केलेल्या यशस्वी प्रयोगांचाही या प्रदर्शनात समावेश आहे. एकात्मिक कीड नियंत्रणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'चा वापर, उत्पादकता वाढविण्यासाठीच्या वेगवेगळी पद्धतींचेही प्रदर्शन या ठिकाणी पहायला मिळत आहे. सेंद्रिय खते, नैसर्गिक खते, वेगवेगळ्या खतांचे मिश्रणे, माती परीक्षण ते कापणीपर्यंतच्या वेगळगवेगळ्या तंत्रज्ञानाची झलक येथे पाहायला मिळते, तरी शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पणनच्या योजनांचा लाभ बाजार समित्यांच्या माध्यमातून मिळत आहे. गावातील विकास सहकारी संस्थांचे बहुउद्देशीय संस्थात रूपांतरण करण्याचा केंद्र शासनाच्या प्रयत्न असून १८ प्रकारचे व्यवसाय या संस्थाना करता येणार आहेत. बाजार आणि शेतकऱ्यांमध्ये दुवा ठरण्याचे काम या संस्था करतील. स्टोरेज, कोल्ड स्टोरेज आदी व्यवस्था करून शेतकऱ्यांच्या माल योग्य भावात मोठ्या प्रमाणात माल विकला जाईल असा प्रयत्न असल्याचेही श्री. फडणवीस म्हणाले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती अत्यंत प्रगतिशील असून अत्यंत चांगले काम करते. समितीने पणन विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेऊन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

ॲड. कोकाटे म्हणाले, वारकरी आणि शेतकरी हे वारीच्या दोन बाजू आहेत. शेतीत येणाऱ्या तंत्रज्ञानाची वारीत सहभागी शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी चांगले प्रदर्शन भरविण्यात आले आहे. शेती चांगली आणि सुरळीत करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे. या प्रदर्शनात सुमारे २५० स्टॉलच्या माध्यमातून शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, पीएमएफएमई योजना, आत्मा, स्मार्ट प्रकल्प आदींची माहिती व प्रदर्शन केले आहे. या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा.

सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अत्यंत चांगली शेती करतात. केळीची निर्यात मोठी प्रमाणात होते.माशीमुळे डाळिंब आणि इतर फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी बॅगेज, ठिबक, मलचिंग पेपर आदीं योजनांचा फलोत्पादसाठी शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्य आणि केंद्र सरकार मिळून शेतकरी स्वयंपूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. आपल्याला एआय मध्ये मोठे काम करायचे आहे. त्यासाठी राज्य शासनाने कृषी मध्ये ५००, कोटींची तरतूद केली आहे, असेही ड. कोकाटे म्हणाले.

श्री. रावल म्हणाले, पंढरपूर बाजार समिती ही उत्कृष्ट बाजार समिती आहे. केळीचे सर्वात मोठे निर्यात हब सोलापूर जिल्हा आहे. मनुके, द्राक्ष, डाळिंबाच्या क्षेत्रात प्रगती करणारा हा जिल्हा आहे. ड्रॅगन फ्रुटचे लागवड करण्याचे धाडस या तालुक्यात झाले आणि ते यशस्वीही करण्यात आले.

लवकरच एडीबीची योजना राज्यात आणण्याचा प्रयत्न होणार आहे. यामध्ये मार्केट कमिटीची बळकटी करण्यासाठी योजना आणण्यासाठी प्रयत्न होणार. त्यात पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रशांत परिचारक यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, ही बाजार समिती एक अग्रेसर बाजार समिती आहे. ५५० कोटीच्यावर उलाढाल या बाजार समितीच्या माध्यमातून केली जाते. बेदाण्याचे मोठे मार्केट या बाजार समितीत आहे. चांगल्या प्रकारची शेती या भागातील शेतकरी करतात. मुख्यमंत्री यांनी पंढरपूर हे भविष्यकाळातील एक मोठे तीर्थक्षेत्र होण्यासाठी ध्यास घेतला आहे. प्रशासनाने आषाढी वारीचे अत्यंत चांगले नियोजन केले, असेही ते म्हणाले.

यावेळी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड, उपसभापती राजू गावडे संचालक मंडळ आदी उपस्थित होते.



## वाखरी येथे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.निकिता देशमुख यांनी केली वारकरी बांधवांची सेवा





वारकरी बांधवांच्या आरोग्याची तपासणी करुन जपली सामाजिक बांधिलकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : आषाढी वारीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील लाखो वारकरी पायी चालत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघाले आहेत. पायी वारीत वारकर्यांचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी वाखरी ता.पंढरपूर येथे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.निकिताताई देशमुख यांनी पुढाकार घेऊन वारकरी बांधवांच्या आरोग्याची तपासणी करुन सामाजिक बांधिलकी जोपासत सर्वापुढे एक आदर्श निर्माण केला. आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या पुढाकारातून व संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा सामाजिक उपक्रम वारकर्यांची मने जिंकणारा ठरला.

राजकारणापेक्षा समाजकारणाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या मनात आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी यांनी स्थान मिळविले आहे. नागरिकांच्या सोयी-सुविधांसोबतच त्यांच्या आरोग्याचीही ते काळजी घेत असतात. त्याचदृष्टीने वाखरी येथे पंढरीत जाण्यापूर्वी थकलेल्या भाविकांची सेवा व वारकर्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ. निकिता ताई बाबासाहेब देशमुख यांनी वारकर्यांना कोणताही बडेजाव न करता अत्यंत साधेपणाने आरोग्याची विचारपूस करुन तपासणी केली. यावेळी त्यांनी अनेक वारकरी बांधवांच्या आरोग्याची तपासणी करुन, औषधे देण्यात आली. यावेळी पायी चालण्यामुळे वारकर्यांना होणारे स्नायू विकार, ताप, थकवा, डोकेदुखी, पायांची सूज अशा तक्रारींसाठी तात्काळ औषधोपचार उपलब्ध करून देण्यात आले.


खांद्यावर भगवी पताका आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन पंढरीची वाट चालणार्या हजारो वारकर्यांची आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ. निकिता ताई देशमुख यांनी तपासणी केली. ११ वेळा आमदार असणार्या व अत्यंत साधेपणा जपलेल्या स्व.डॉ.गणपतराव देशमुख यांच्या विचारांचा वारसा प्रथमच आमदार झालेले डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.निकीताताई देशमुख हे आपल्या कार्यातून पुढे चालवित असल्याचे उपस्थित वारकरी बांधवांमधून बोलले जात होते. 'न भुतो'.. असा हा उपक्रम निश्चितच वारकर्यांची खर्या अर्थाने आरोग्य सेवा देणारा ठरला आहे.

# मराठी तेलुगू भाषिक अनुबंध : संस्कृतीच्या परस्पर संबंधाचा शोध घेणारे पुस्तक : प्रा. डॉ. नरसिंग कदम बनवसकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे.हवेशिवाय माणूस जिवंत राहू शकत नाही तसे भाषेशिवायही जिवंत राहू शकत नाही असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण माणूस हा समाजशील प्राणी आहे. आपल्या मनातील विचारभावना व्यक्त केल्याशिवाय त्याचे मन हलके होत नाही. दैनंदिन जीवनात संवाद साधण्यासाठी, माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी, व्यवहार पूर्तीसाठी भाषेचा उपयोग केला जातो. भाषेद्वारे केवळ संवादच साधला जातो असे नव्हे तर मानवी भावना, विचार, कल्पना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणजे भाषा आहे. भाषा अगोदर का मानव अगोदर? हा प्रश्नही आपल्याला विचार करण्यास प्रवृत्त करतो. परंतु अगोदर मानवाची निर्मिती झाली. सुरुवातीला तो एकएकटा राहत होता.नंतर तो समूहाने रहायला लागला.त्यावेळी त्याला विचाराची देवाण घेवाण करण्याची आवश्यकता भासली. भय, दुःख, आनंद व्यक्त करण्यासाठीचे माध्यम असणे त्याला गरजेचे वाटू लागले. त्यातूनच हावभावाची भाषा आली. त्याचा विकास होत चिन्ह, चित्र, ध्वनी, शब्द भाषा उदयास आली.

समूहाने राहणाऱ्या माणसांचे संरक्षणाचे प्रश्न मार्गी लागले तसतसे इतर गरजा त्याच्या समोर उभ्या राहिल्या. त्यातूनच मनोरंजन, सणवार, पूजाविधी साजरे होऊ लागले. हे चालू झाल्यानंतर संस्कृती पाय रोऊ लागली. प्रदेशवार बोलीभाषा बोलल्या जाऊ लागल्या. प्रत्येकाने आपआपली संस्कृती जपली. ज्यावेळी आदान प्रदानाला सुरुवात झाली तेव्हा संस्कृतीचेही आदान प्रदान होणे क्रमप्राप्त झाले. त्यातूनच एका भाषिकाचा दुसऱ्या भाषिकाशी संबंध यायला लागला. भाषा ही परिवर्तनशील, लवचिक असल्यामुळे ती





बदल स्वीकारू लागली. त्यामुळे अनेक भाषेचा विविध माध्यमातून अनुबंध होऊ लागला. असाच एक अनुबंध कशा पद्धतीने आला याचा चिकित्ताक अभ्यास डॉ.दत्तराम राठोड यांनी मराठी तेलुगू भाषेच्या संदर्भात केला. त्या अभ्यासाची फलश्रुती म्हणजेच हे पुस्तक होय.

डॉ. दत्तराम राठोड हे व्यवसायाने पोलिस अधीक्षक आहेत. पण उत्तम अभ्यासक आहेत. आपला व्यवसाय प्रामाणिकपणे सांभाळत ते मराठी भाषेची सेवा करत आहेत. अभ्यासाची आवड असल्यामुळे त्यांनी नुकतीच सेट परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांनी कठोर मेहनतीच्या बळावर विविध २५ पदव्या संपादन केल्या. खरेतर पोलिस खाते म्हणजे खूप व्यस्त असणारे खाते आहे. अनेक भार सांभाळून त्यांनी अभ्यासाचे सातत्य राखले. म्हणतात ना, 'आवड



असल्यानंतर सवड मिळते'. अगदी त्याच न्यायाने ते कार्य करताना दिसतात. संधीचे सोने करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे राठोड असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण गडचिरोली येथे पहिलीच पोस्टींग मिळाली.ती त्यांनी आनंदाने स्वीकारली. या भागात बरेच अधिकारी पोस्टिंग मिळाल्यानंतर जॉइन होत नाहीत.पण राठोड यांनी ते आव्हान संधी म्हणून स्वीकारले. आणि तेथील भाषेचा, सांस्कृतिक, सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला. कोणतीही गोष्ट सकारात्मक पद्धतीने स्वीकारली तर त्यात यश संपादन करणे सोपे जाते. अगदी त्याच न्यायाने त्यांनी त्या भागातील भाषेवर पीएचडी केली आणि त्याचेच पुन्हा पुस्तक तयार झाले. पुस्तक म्हणजे 'मराठी तेलुगू भाषिक अनुबंध होय.

लेखकाने दक्षिण सीमावर्ती गडचिरोली भागात मराठी भाषेवर तेलुगुचा पडलेला सामाजिक व सांस्कृतिक प्रभाव कसा होता? हे उलगडून दाखवले. प्रत्येक भाषेमध्ये संस्कृतीचे पदर असतात असेच पदर मराठी आणि तेलुगू भाषेमध्ये आहेत. महाराष्ट्रातील आरे लोक आंध्र प्रदेशात जाऊन स्थायिक झाले. जाताना इकडचा सांस्कृतिक वारसा तिकडे नेला. असा भाषेवर पडलेला प्रभाव यांचे चिंतन आणि मंथन राठोड यांनी करून नव अभ्यासकांना पुस्तकाच्या माध्यमातून नवशिदोरी दिली. कुणबी ग्रामीण गीताच्या माध्यमातून हा अनुबंध जोडला गेल्याचे अनेक उदाहरणे त्यांनी दिली. यामध्ये वैवाहिक गीते, देवदेवतांना आवाहन करणारी गीते, हळद, पूजा, देवक, गोंडर्ला, ओटी भरणे, नामकरण, भावगीते अशा विविध गीतातून संस्कृती जपण्याचे काम झालेले पहायला मिळते. त्याचा सविस्तर अभ्यास लेखकांनी केला.

' कुंभार माझ दाद

बरलाल जात होता वोरे त्याला रुपियाचा गरबु '

किंवा

गागाकोरी पंगास माल माझा

एगा गोरे डोंगरा सेतु माझा सकक्ळे उडूनू सुली सारावो मी

एइनरे वंपा संसार रीतु माझा '

अशा गीताने नातेसंबंध,विधी, रितीरिवाज, सण समारंभ, मानवी स्वभाव विविधांगी पातळीवरून रेखाटलेले पहायला मिळते.

महाराष्ट्र व तेलंगणा या सरहद्दीवरील प्रांतातील कुणबी लोकांचे आचार-विचार व व्यवहार यामध्ये फरक जाणवतो. त्याचा विवेचक अभ्यास राठोड यांनी केला. तर काही साम्यही आढळते. जसे की चांद्रमान पंद्धतीने आंध्रप्रदेश-तेलंगणा, महाराष्ट्र व कर्नाटकातील लोक हे चैत्र शुद्ध प्रतिपदेला नववर्ष प्रारंभाला गुढीपाडवा हा सण साजरा करतात. तर तेलंगणा प्रांतामध्ये स्थायिक झालेल्या निर्वासित कुणबी लोकांची काही वेगळी लक्षणेही पहायला मिळाली. जसे की हे कुणबी लोक शाकाहारी आहेत, ते जाणवे धारण करत नाहीत.अशा विविध विषयाच्या अनुषंगाने त्यांनी अभ्यास केला.

त्या काळामध्ये लिहिलेल्या जानपद साहित्याचा त्यांनी अभ्यास केला. यामध्ये स्त्री गीते, सण उत्सव, गीत,कथा, कादंबरी, नाटक, नवीन रचना याचाही चिकित्सक पद्धतीने विचार मांडणारे हे पुस्तक आहे. साहित्यातील साम्य भेदाचा अभ्यास करून त्याला अतिशय मार्मिकपणे शब्दबद्ध केले. आंध्र प्रदेश, तेलंगणा व महाराष्ट्र या संस्कृतीच्या परस्परावर असलेला प्रभाव दोन्ही भाषेतील समाज, चालीरीती, जीवन व सांस्कृतिक जीवन, रूढी परंपरा, विवाह पद्धती, सण यांचा प्रभाव मराठी लोकांवर कसा पडला. तेलुगु मधील ग्रामीण साहित्य कुणबी गीते याचा सांस्कृतिक प्रभाव अशा विविध अंगाने चिंतनातून आकारास आलेले पुस्तक हे अतिशय वाचनीय झालेले आहे.

ज्यांना दोन राज्यातील सांस्कृतिक, सामाजिक ,साहित्यिक, भाषिक अंगाने अभ्यास करावयाचा आहे त्यांच्यासाठी हा खूप मोठा दस्तावेज बनलेला आहे. संशोधन करणाऱ्या प्रत्येकाला हे पुस्तक मार्गदर्शक ठरणार आहे. प्रत्येकाने संग्रही ठेवावे असे हे पुस्तक आहे. राठोड यांनी खूप मेहनत करून, भ्रमंती करून ,लोकांशी संवाद साधून या पुस्तकाची निर्मिती केलेली आहे. या पुस्तकामुळे नवीन संशोधन करणाऱ्याला त्या प्रदेशात भटकंती करायची गरज भासणार नाही असे मला वाटते.अतिशय अभ्यासपूर्वक चिंतनातून आकरास आलेल्या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील असा मी आशावाद बाळवतो व लेखकाला पुढील लेखनासाठी शुभेच्छा देतो.

**समीक्षक –**
**डॉ.नरसिंग अप्पासाहेब कदम**
**प्रोफेसर छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय, उदगीर जिल्हा लातूर तथा सदस्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य, मुंबई .९४०४७३१०१०**

# शासनाच्या 'घर घर संविधान' साक्षरता जनजागृती उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात माणगांव शिक्षण विभाग रायगड जिल्ह्यासह राज्यात अव्वल स्थानावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उपक्रम यशस्वी करण्यात ग. शि. सुरेखा तांबट यांच्या नेतृत्वाखाली संविधान प्रचारक नुरखा पठाण, असंख्य विद्यार्थी, शिक्षक, केंद्र प्रमुख आणि तंत्रस्नेही यांची उल्लेखनीय कामगिरी

बोरघर / माणगांव ( प्रतिनिधी) भारतीय संविधानाचे महत्त्व समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचवण्यासाठी माणगाव तालुक्याच्या शिक्षण विभागाने हाती घेतलेला 'घर घर संविधान' हा अभिनव उपक्रम केवळ यशस्वीच ठरला नाही, तर आता तो दरवर्षी राबवला जाणार आहे. २६ जून रोजी, 'सामाजिक न्याय दिनी' आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधत, ना. म. जोशी विद्याभवन गोरेगाव येथे पार पडलेल्या भव्य गौरव सोहळ्यात ही घोषणा करण्यात आली. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात सुरू झालेला हा उपक्रम आता महाराष्ट्रासाठी एक नवा आदर्श घालून देत आहे.

या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या संविधान गुणगौरव परीक्षेत हजारो विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या परीक्षेत तालुकास्तरावर पहिले तीन क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा गौरव सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन करण्यात आला. याव्यतिरिक्त, क्रीडा व नवोदय परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांनाही सन्मानित करण्यात आले.

रायगड जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी सुनिल भोपळे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. त्यांच्यासोबतच, माणगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती सुरेखा तांबट, कुमार खामकर, धुळदेव कोळेकर, संजय पालांडे, शंकर शिंदे यांसह अनेक केंद्रप्रमुख, शिक्षक, चारिझेन फाऊंडेशनचे पदाधिकारी आणि पत्रकार उपस्थित होते. दीप प्रज्वलन, महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ना. म. जोशी विद्याभवनच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले ईशस्तवन व स्वागतगीत मनमोहक ठरले, तर संविधानाच्या उद्देशिकेच्या वाचनाने कार्यक्रमाला ऊर्जा मिळाली. मान्यवरांचे स्वागत रोप व पुस्तक देऊन अनोख्या पद्धतीने करण्यात आले. पत्रकार विश्वास गायकवाड, पत्रकार कडू आणि उपस्थित मान्यवर, एनजीओ कडून माणगांव शिक्षण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'घर घर संविधान' या अनोख्या आणि आगळ्यावेगळ्या प्रेरणादायी संविधान साक्षरता, जनजागृती उपक्रमाचे मनस्वी कौतुक शुभेच्छा



संविधानाचा जागर आता निरंतर!

गट शिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी आपल्या प्रास्ताविकात या उपक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली आणि एक महत्त्वपूर्ण घोषणा केली: हा उपक्रम केवळ एका वर्षापुरता मर्यादित नसून, शिक्षणाच्या माध्यमातून सुजाण नागरिक घडवण्यासाठी 'घर घर संविधान' जनजागृतीचा उपक्रम माणगाव तालुक्यात दरवर्षी राबवण्यात येईल. या वर्षापासून, म्हणजेच ५ जुलैपासून, हा उपक्रम पुन्हा नव्याने सुरू होणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

'घर घर संविधान' उपक्रमाच्या यशाचा अहवाल पुस्तक आणि व्हिडिओ स्वरूपात प्रकाशित करण्यात आला, ज्यामुळे या उपक्रमाची व्याप्ती आणि भव्यता स्पष्ट झाली. संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांनी आपल्या मनोगतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी संविधान कसे वरदान ठरवले, याची आठवण करून दिली. ते म्हणाले, एक महिला अधिकारी म्हणून आदरणीय सुरेखा तांबट मॅडम यांनी या संविधानाचे ऋण फेडण्याचे कार्य केले, हे अत्यंत अभिमानास्पद आहे. त्यांनी हा उपक्रम संपूर्ण रायगड जिल्ह्यात राबवण्याची विनंती शिक्षणाधिकारी सुनील भोपळे साहेबांना केली.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांचा गौरव

'घर घर संविधान' उपक्रम नाविन्यपूर्ण पद्धतीने राबविल्याबद्दल जि. प. शाळा कोस्ते बुद्रुक, जि. प. शाळा होडगाव, ना. म. जोशी विद्याभवन गोरेगाव व जे. बी. सावंत विद्यालय लोणेरे या शाळांचा विशेष सन्मान करण्यात आला. याव्यतिरिक्त, संविधान गुणगौरव परीक्षेत सर्वाधिक विद्यार्थी सहभागी करून घेतल्याबद्दल गोरेगाव येथील ए. के. आय. उर्दू शाळेचाही सत्कार करण्यात आला.

रायगड जिल्ह्यात 'संविधान' विस्ताराची नांदी

अध्यक्षीय भाषणात शिक्षणाधिकारी सुनील भोपळे यांनी माणगावच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. माणगावने घालून दिलेल्या आदर्शानुसार, हा उपक्रम आता संपूर्ण रायगड जिल्ह्यात राबवण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले, ज्यामुळे या जनजागृतीला व्यापक स्वरूप प्राप्त होणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माणगाव तालुक्यातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक बंधू-भगिनी आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले. योगेश शेलार व सुधा मोरे यांनी सूत्रसंचालन अतिशय नियोजनबद्ध केले, तर केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

'घर घर संविधान' या उपक्रमामुळे संविधानाचे महत्त्व आणि त्यातील मूल्यांची जाणीव नव्या पिढीमध्ये खोलवर रुजण्यास निश्चितच मदत होईल. माणगावने सुरू केलेला हा जागर आता जिल्ह्याभरात पसरून, महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीत महत्त्वाचा टप्पा ठरेल, अशी अपेक्षा आहे.

## पर्यावरणाची पूजा, रक्षण व संवर्धनाने जग वाचवण्याचा संतांचा संदेश

# पर्यावरण वारीच्या माध्यमातून विठ्ठल भक्तांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पर्यावरणाची वारी पंढरपूरच्या दारी हा उपक्रम १६ वर्षापासून अत्यंत प्रभावीपणे राबवला जात आहे. या माध्यमातून आळंदीपासून ते पंढरपूरपर्यंत पर्यावरण संवर्धनासाठी प्रबोधन केले जात आहे. आपल्या सर्व संतांनी पर्यावरणाची पूजा, रक्षण व संवर्धन करून जग वाचवण्याचा संदेश दिला. हा संदेश अनुसरत सर्व विठ्ठल भक्तांनी वारीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आणि महाराष्ट्र कला संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' या आळंदी ते पंढरपूर पायी वारीच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, रणजीतसिंह मोहिते पाटील, अभिजीत पाटील, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रदूषण मंडळाचे प्रभारी सचिव रवींद्र आंधळे, माजी आमदार प्रशांत परिचारक, राजेंद्र राऊत व अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडवणीस म्हणाले, वातावरणात झालेल्या बदलामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून जल, वायू व वनराईचे महत्त्व समजून न घेतल्यास जग विनाशाकडे जाईल. त्यामुळे पर्यावरणाच्या जागर हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असून या माध्यमातून पर्यावरणाचे संवर्धनासाठी जनजागृती केली जात आहे.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली महाराजांनी हिरवी वनराई फुलवण्याचे आवाहन केले तर जगद्गुरु संत तुकाराम यांच्या 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे' या अभंगातून निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला. हा संदेश घरोघरी पोहोचवीत आपल्याला वनराई वाढवायची आहे, प्रदूषण कमी करायचे आहे. यासाठी प्रत्येक नागरिकांनी पर्यावरण संवर्धनातील आपली जबाबदारी ओळखून वृक्ष लागवडीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन श्री.फडणवीस यांनी केले.





यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, श्रीमती अमृता फडणवीस, श्रीमती सोनिया गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील आदी भजनाचा टाळ वाजवत ठेका धरत ज्ञानोबा तुकाराम, जय जय राम कृष्ण हरी असा गजर करत वारकरी यांच्या समवेत भक्तीरसात दंग होऊन गेले.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमाचा समारोप; मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृह परिसरात वृक्षारोपण**

यावेळी महाराष्ट्र कला संस्कृती मंचचे ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे, श्रीमती चंदाबाई तिवाडी, शाहीर पृथ्वीराज माळी, सत्यपाल महाराजांचे सप्त खंजिरी भजन, श्रीमती शैलाताई घाडगे यांच्यासह अन्य कलाकारांनी किर्तन, भारुड, पोवाडा यांच्या माध्यमातून टाळ मृदुंगात हरिनामाचा गजर करत पर्यावरणाचे संवर्धन व समतोल राखण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदूषण विभागाचे जनसंपर्क अधिकारी संजय भुस्कटे यांनी केले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चरणी सोन्याचा पोषाख

## आषाढी एकादशीच्या नित्यपूजेनंतर परिधान करण्यात येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चरणी नाव न सांगण्याच्या अटीवर दानशूर भाविकांकडून सोन्याचा पोषाख व चांदीने मढविलेले सागवाणी लाकडाचे पाट अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



श्री विठ्ठलासाठी तांबड्या रंगाची वेलवेट अंगी, अंगीच्या गळ्याला ३ पदरी मोत्याची माळ, गळपट्टीला सोन्याची चैन, खांद्याला दोन बाजूबंद, बंधाला मोत्याचे लटकन व सोने, दोन्ही हाताला ब्रेसलेट, प्रमाणित गोल मोत्याचे मणी व यामध्ये कौस्तुक मण्यासारखा मध्यभागी हिरवा मणी तसेच आंबा कलरचा शेला, त्यामध्ये मोत्याच्या सुरमण्या, त्यास सोन्या व मोत्याचे पूर्णपणे वर्क आहे. श्री रूक्मिणीमातेसाठी आंबा कलरची सिल्क पैठणी, सोन्याची ठुसी, मंगल-सुत्र, जोडवे, पैजन, बांगड्या, नथ इत्यादी सौभाग्यचं लेणं अर्पण केले आहे. याशिवाय, दोन सागवानी पाट चांदीने मढवून दिले आहेत. श्रींच्या पोषाखासाठी १० तोळे सोन्याचा वापर करून, त्यासाठी सुमारे ११ लक्ष तसेच चांदीच्या पाटासाठी ४ किलो चांदीचा वापर व त्यासाठी ४ लक्ष रूपयाचा खर्च आला आहे.

सद्यस्थितीत, आषाढी यात्रेचा कालावधी सुरू असल्याने भाविकांची मंदिर परिसर व दर्शनरांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. या यात्रेचा मुख्य सोहळा रविवार दिनांक ०६ जुलै रोजी संपन्न होत आहे. या दिवशी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेची नित्यपूजा झाल्यानंतर वरील प्रमाणे सोन्याचा पोषाख श्रीस परिधान करण्यात येणार आहे. संबंधित देणगीदार हे श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत. यापूर्वी त्यांनी श्रींच्या चरणी चांदीची कळशी भेट दिली होती असे यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (जिमाका) : आषाढी शुद्ध एकादशी निमित्ताने वाखरी येथे पोहोचलेल्या आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन घेतले. श्री. फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समवेत पालखी खांद्यावर घेऊन दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला.



टाळ मृदंगआणि विठू माऊलीच्या गजरात वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे श्री माऊलींची प्रतिमा देऊन स्वागत केले.

वाखरी येथे जिल्हा प्रशासनाने वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांची पाहणीदेखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. वारकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार गोपीचंद पडळकर, अभिजित पाटील, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस विशेष महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह हजारो वारकरी भाविक उपस्थित होते.

# डुबेरे येथील जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनुभवला रिंगण सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी:- डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मविप्र संस्थेचे सिन्नर तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या प्रागणांत आकर्षक व सुंदर गोल रिंगण केल्याने विद्यार्थ्यांसह पालकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

सर्वप्रथम आकर्षक सजावट केलेल्या पालखीत ठेवलेल्या विठुरायाच्या मूर्तीची व ग्रंथांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शालेय समितीचे सदस्य भाऊ रखमा वारुंगसे, मुख्याध्यापक रंगनाथ उगले,पर्यवेक्षक उल्हास पवार आदींच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन करण्यात आले.

मुख्याध्यापक उगले यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्व सांगून कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत केले .यावेळी केलेल्या गोल रिंगणात विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी नाचून फुगडीचा आनंद घेतला.विद्यालयातील जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी वारकरी पोशाख परिधान केला होता. ह.भ.प किरण वाजे ,उमाकांत महाराज ननावरे ,पंकज भालेराव, विशाल ननावरे ऋषिकेश कुंदे यांनी दिंडीत सक्रीय सहभाग घेऊन भजन व अभंग गाऊन रंगत आणली. टाळ-मृदुंगाच्या गजरात संपूर्ण शालेय परिसर दुमदुमला. विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला .दिंडीचे आयोजन व सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत,संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्करराव ढोके,शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सोमनाथ गिरी,सुनिल ससाणे,सोमनाथ पगार,डी.ए.रबडे,रेखा खंडीझोड ,शिवाजी गुरुळे,रामदास वारुंगसे,जयश्री गोहाड,कचेश्वर शिंदे,रवि गोजरे,किशोर शिंदे,ज्ञानेश्वर कडभाने आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.






# गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व मान्यवर सत्कार सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी:

असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स, सोलापूर चे जनरल सेक्रेटरी अभिजीत सिद्धार्थ गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त एक प्रेरणादायक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या विशेष प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व मान्यवरांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम माशाळे नगर कराटे क्लास, विजापूर रोड, सोलापूर येथे पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया जीत कुने डो फाउंडेशनचे उपाध्यक्ष ग्रँडमास्टर युवराज गायकवाड सर, वसुंधरा कला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. बापू राऊत, सौ. रेणुका मंद्रुपकर मॅडम, टेक्निकल डायरेक्टर श्री. आनंद जाधव, श्री. शिवा पाटणकर, सोलापूर महानगरपालिकेचे माजी क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात असोसिएशनचे मास्टर्स सम्राट गायकवाड, अनुराग देडे, संदीप गायकवाड, सुमित पाटील, श्रवण घोलप, नागेश कांबळे, तसेच लेडीज कोच सत्यभामा गायकवाड, वैभवी दळवी, किमया सपाटे यांची विशेष उपस्थिती लाभली. परिसरातील ज्येष्ठ नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

या वेळी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये १०वी व १२वी बोर्ड परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना 'गुणवंत विद्यार्थी पुरस्कार' देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करत प्रेरणादायी विचार मांडले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा ठरला असून, कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत सुयोग्यपणे व उत्साहात पार पडले.

# नागरिकांचे हरवलेले, चोरीस गेलेले मोबाईल मुळ फिर्यादी यांना परत करण्याचा कार्यक्रम





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाळासाहेब अहिरे/उल्हासनगर

ठाणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत उल्हासनगर विभागातर्फे नागरिकांचे हरवलेले/चोरीस गेलेले मोबाईल मुळ फिर्यादी यांना परत करण्याचा कार्यक्रम आज दि. ०४/०४/२०२५ रोजी .मिट टाउन हॉल, गोल मैदान, उल्हासनगर २ या ठिकाणी घेण्यात आला. ख सदरचे मोबाईल वाटप हे मा . सचिन गोरे (पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४ उल्हासनगर) यांच्या हस्ते फिर्यादींना परत देण्यात आले. सदरवेळी वपोनि / अनिल पडवळ (विठलवाडी पोलीस स्टेशन ), वपोनि / शंकर अवताडे (मध्यवर्ती पोलीस स्टेशन) व उल्हासनगर विभागातील पोलीस स्टेशनच्या सायबर टिम असे उपस्थित होता. सदर यावेळी उल्हासनगर पोलीस स्टेशन येथील पाच लाख पंचेचाळीस हजार रूपयाचे एकुण ४२ मोबाईल, मध्यवर्ती पोलीस स्टेशनचे एक लाख छप्पन्न हजार रूपयांचे एकुण १२ मोबाईल, विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनचे दोन लाख चौथीस हजार रूपयांचे एकुण १८ मोबाईल असे एकुण ७२ मोबाईल वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रम वेळी नागरिकांनी आमच मोबाईल शांधण्यासाठी पोलीसांनी रात्रंदिवस मेहनत कली, पोलीस यांच्या मुळे माबाईल मिळाला त्यामुळे पोलीसांचा अभिमान वाटतो अशा भावना व्यक्त केल्या. पोलीस यांच्या कडून त्यांच हरवलेले चोरीस गेलले मोबाईलचा शोध घेतल्याने पोलीसांच्या कामाचे मनापासुन धन्यवाद व्यक्त केले. तसंच माबाईल परत मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद दिसत होता.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आषाढी एकादशी निमित्त रंगला विद्यार्थ्यांचा रिंगण सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सुरेखा कल्याणशेट्टी माध्य.व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय यांच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांनी दिंडी सह पालखी व रिंगण सोहळा पार पाडला.



प्रथम पालखीसह विठ्ठल रुक्मिणी यांच्या मूर्तीचे पूजन संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सेमी विभागाचे प्रमुख रूपाली शहा व ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे संचालक मल्लिकार्जुन मसुती, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, हे उपस्थित होते.

यावेळी माध्यमिक मराठी विभागाची संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी, माध्यमिक सेमी इंग्रजी विभागाची संत तुकाराम महाराज पालखी व कनिष्ठ महाविद्यालयाची संत गजानन महाराज पालखी अशा तीन दिशाकडून तीन पालख्या विद्यार्थ्यांनी सवाद्य टाळ, मृदंगाच्या तालात, विठ्ठल नामाच्या गजरात शाळेच्या मैदानावर एकत्रित घेऊन आल्या. यावेळी दिंडीत पारंपारिक वेशभूषेत शिक्षकांसह, मुले आणि मुली सहभागी झाले होते. मुली व शिक्षिका नऊवारी साडीत आणि मुले व शिक्षक नेहरू शर्ट,विजार व टोपी आणि सर्वजण कपाळावर गंध लावले होते. त्यामुळे दिंड्या, पताके, पालख्या, वारकरी वेशभूषेतील हा सोहळा पाहून जणू शाळेत पंढरीच अवतरली की काय असा भास होत होता. विठ्ठल नामाचा जयघोषाने शाळेचा परिसर दुमदुमला होता.

अतिशय नयनरम्य असा दिंडी व रिंगण सोहळा पार पडला. यानंतर मुला मुलींनी फुगडी, भावगीत, भक्ती गीत व पारंपरिक नृत्य सादर केले. यात विद्यार्थी शिक्षक व संस्थेचे पदाधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना स्वामी व दिगंबर जगताप यांनी केले, संपूर्ण कार्यक्रमाचे चित्रीकरण व व्हिडिओ सागर मठदेवरू, विद्या बिराजदार, बालाजी कांबळे व शितल टिंगरे यानी केले तर उपस्थितांचे आभार निशिगंधा सोमेश्वर यानी मानले.

या कार्यक्रमास प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेमी विभागाचे दिगंबर जगताप, सेवानिवृत्त माजी शिक्षक खंडेराव घाटगे, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, रविकिरण दंतकाळे, सिद्रामप्पा पाटील, कुमार जाधव, सलोनी शहा, शितल झिंगाडे, आदी शिक्षक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## वागदरी ता. तुळजापूर येथे आयोजित धम्मदेशाना ( प्रवचन ) कार्यक्रम

### भन्ते आनंदबोधी महाथेरो

# बुद्धानी मानवाला समाधानाने जिवन जगण्याचा मार्ग दाखविला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तथागत भगवान गौतम बुद्धानी बौध्द धम्माच्या माध्यतुन संबध मानवाला कर्मकांड मुक्त समाधानाने जिवन जगण्याचा मार्ग दाखविला आहे. म्हणूनचं महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी बहुजनाना कर्मकांड मुक्त आनंददायी जीवन जगण्याकरिता बौद्ध धम्म दिला आहे.तेंव्हा तथागतानी सांगीतलेल्या आर्य अष्टांगीक मार्गाचा अवलंब करून मानवाने सुखी समाधानाने आनंदी जीवन जगले पाहीजे. असा उपदेश पूज्य भन्ते आनंदबोधी महाथेरो (नागपूर ) यानी वागदरी ता.



तुळजापूर येथे आयोजित धम्मदेशाना ( प्रवचन ) कार्यक्रमात केला.

तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील पंचशील बुद्ध विहारात दि.२ जुलै २०२५ रोजी समस्त बौद्ध बांधवांच्या वतीने वर्षावासाच्या पूर्वसंध्येला धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी भन्ते आनंदबोधी महाथेरो बोलत होते. प्रारंभी उपासिका गीताबाई नामदेव झेंडारे यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामुदायिकरित्या बुध्द वंदना घेण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसुंचलन रिपाइं (आठवले) चे धाराशिव जिल्हा सचिव एस.के. गायकवाड यानी केले.यावेळी सेवानिवृत्त पोलीस हवालदार संदिपान वाघमारे,अनिल वाघमारे, शिवाजी वाघमारे, चंदकांत वाघमारे,हणमंत वाघमारे, सुर्यकांत वाघमारे, दिपक वाघमारे, कुंडलिक वाघमारे, भामाबाई वाघमारे श्रीदेवी वाघमारे, विमलबाई बरसडे,माजी उपसपंच कविता गायकवाड, उज्वला वाघमारे, श्रीदेवी महादेव वाघमारे, कोमल झेंडारे, कमळाबाई वाघमारे, शुष्मा वाघमारे, ठकूबाई वाघमारे, कमलबाई धाडवे,जिजाबाई वाघमारे सह ग्रामस्थ, महिला, युवा कार्यकर्ते मोठया रुंख्येने उपस्थित होते.

# वाद सोडवताना मारहाण ; तिघांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) वाद चालू असताना तो सोडवण्यासाठी गेल्यावर शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३ जुलै रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी कमल वसंत साखरे (वय-६५,रा.यशवंत नगर, भाजी मार्केट,बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून उमेश मारुती चेंडगे,निलेश गावडे व उषा मारुती चेंडगे (सर्व राहणार सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांच्या गाडीचा ड्रायव्हर शुभम व शेजारी राहणारे निलेश गावडे यांच्यात वाद चालू असताना तो सोडवण्यासाठी मध्ये गेले असता, फिर्यादी यांचा भाचा उमेश चेंडगे व इतर संशयित आरोपी यांनी मिळून फिर्यादी व फिर्यादी यांचा मुलगा अण्णासाहेब याला शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादी यांना उमेश शेंडगे याने ढकलून दिल्याने ते खाली जाऊन पडल्या.त्यानंतर भांडणात गळ्यातील मंगळसूत्र तुटून कुठेतरी पडले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार खाटमोटे हे करीत आहेत.

दैनिक
यश सिद्धि न्यूज


# संतांचे संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचे काम निर्मल दिंडीच्या माध्यमातून : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'निर्मल दिंडी', 'चरणसेवा' आणि 'आरोग्यवारी' उपक्रमाचा समारोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सर्व संतांनी निसर्गप्रेमाचा आणि स्वच्छतेचा संदेश दिला आहे, आपल्या नद्यांवर, निसर्गांवर प्रेम करायला शिकवले आहे. त्यामुळे विठुमाऊलीच्या दर्शनाला येताना त्यांचा संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचे काम निर्मल दिंडीच्या माध्यमातून वारकरी करतात, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंढरपूर पंचायत समिती आवारात ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्यावतीने आयोजित श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महार-ाज पालखी सोहळा 'निर्मल दिंडी' तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रम आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'आरोग्यवारी' उपक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पणन मंत्री जयकुमार रावल, कृषी मंत्री ड. माणिकराव कोकाटे, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार समाधान आव-ताडे, अभिजित पाटील, गोपीचंद पडळकर, सचिन कलशेट्टी, डॉ.बाबासाहेब देशमुख, देवेंद्र कोठे, विक्रम पाचपुते, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, लाख-ो वारकरी विठुरायाच्या दर्शनाची आस लाऊन पंढरपूर येथे पोहोचतात. वारी दरम्यान वारकऱ्यांना येणाऱ्या अडचणीचा विचार करुन २०१८ वर्षीप-ासून निर्मलवारी सुरुवात केली. याअंतर्गत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली. सर्व दिंडीमधील वारकऱ्यांनी या संकल्पनेचा स्वीकार केला, त्यामुळे पालखी तळावर घाणीचे साम्राज्य दिसत नाही. महिलांची मोठ्या प्रमाणात सोय झाल्यामुळे वारीमध्ये त्यांची संख्या वाढलेली आहे. आपली वारी निर्मल, स्वच्छ झाली आहे.

ग्रामविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने निर्मलवारी संकल्पना यशस्वीरित्या राबविली, त्याचबरोबर निर्मल दिंडीच्या माध्यमातून लोककलावंत लोकजागर करुन स्वच्छतेबाबतचा संदेश घरोघरी पोहचविण्याचे काम करीत असतात.

विठुरायाच्या दर्शनाची आस लाऊन चालणाऱ्या पावलांची सेवा करून विठुरायांच्या चरणाची सेवा केल्याचे प्रत्यंतर यावे, या सेवाभावाने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाद्वारे चरण-सेवा उपक्रम राबवून वारकऱ्यांचे सेवा केली. त्यांचे आरोग्य आरोग्य व्यवस्थित ठेवण्याचे काम केले.



वारीच्या दरम्यान महिलांना येणाऱ्या मासिक पाळीसह इतर अडचणीचा विचार करता म हाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'आरोग्यवारी' उपक्रमाच्या माध्यमातून महिला वारकऱ्यांची विशेष काळजी घेण्याचा प्रयत्न केला. याकरीता आवश्यता त्या सुविधा उप-लब्ध करुन अतिशय सुंदर नियोजन केले, असे मुख्यमंत्री म्हणाले. पुणे, सातारा आणि सोलापूर प्रशासनाने वारकऱ्यांना अतिशय चांगल्या सुविधा उपलब्ध केल्याबद्दल तसेच निर्मल दिंडी, चरण-सेवा, आरोग्यवारी यशस्वी केल्याबद्दल प्रशासन, सेवाभावी संस्था आदींचे त्यांनी अभिनंदन केले.

वारकऱ्यांची सेवा ही मोठी संधी असून वारीचे चांगल्या प्रकारचे नियोजन करण्याचे प्रशासनाला निर्देश देण्यात आले होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्हा प्रशासनाला सोबत घेऊन वारीचे अतिशय उत्तम नियोजन केले. वारकऱ्यांना जर्मन हँगरच्या माध्यमातून राहण्याची व्यवस्था, महिलांकरीता स्वच्छतागृहासह स्नानगृह, पायाचे मसाज अशा आवश्यक त्या सर्व सुविधा वारकऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला, नवीन उंची गाठत एक उच्चांक निर्माण केला आहे. त्यामुळे यावर्षीच्या वारीचे वेगळेपण पहायला मि ळत आहे. सेवा कधीच संपत नसते, सेवेचे नवीन उच्चांक गाठायचे असतात. याकरिता प्रयत्नपूर्वक वारकऱ्यांची सेवा केली पाहिजे, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

**वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न-ग्रामविकास मंत्री**

श्री. गोरे म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वारी सर्वो त्तम व्हावी, वारकऱ्यांना त्रास होता कामा नये, याकरिता त्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. आषाढी वारी यशस्वी करण्यासाठी प्रशासनासोबत विविध सेवाभावी संस्था, विश्वस्त आदी घटकांनी अहोरात्र कामे करत मनोभावी सेवा करीत आहे. वारकऱ्यांकरिता पालखीतळावर सुविधा देण्याच्यादृष्टीने जर्मन हँगरसह, वैद्यकीय सुविधा, महिलांकरिता शौचालय, स्वच्छतागृहे, मसाज मशीन आदी सर्वोत्तम सुविधा वारकऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला. वारी दरम्यान प्रशासनाच्यावतीने केलेल्या व्यवस्थेबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे श्री. गोरे म्हणाले.

श्रीमती चाकणकर म्हणाल्या, देहू, आळंदी, मुक्ताईनगर, त्र्यंबकेश्वर यांसह विविध भागातून महिला वारकरी वारीत सहभागी होतात. अशा या सहभागी म हिलांच्या मासिक पाळी आदी आरोग्य आणि स्वच्छताविषयक बाबींचा विचार करुन महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने गेल्या ४ वर्षापासून 'आरोग्य वारी' प्रशासनाच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत महिलांकरिता हिरकणी कक्ष, ३७५ ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वितरण, नॅपकिन बर्निंग इन्सिनरेशन आदी सुविधा उपलब्ध करुन दिल्या, असे श्रीमती चाकणकर म्हणाल्या.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले, जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या चरण सेवेचे महत्त्व लक्षात घेता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून पालखी सोहळ्यात कक्षाच्यावतीने प्रथमच 'चरणसेवा' उपक्रम राबविण्यात आला. २ कोटी ७५ हजार वारकऱ्यांची चरणसेवा करण्यात आली. लोकसहभातून एकूण

२ कोटी रुपयाहून अधिक निधी उपलब्ध झाला. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या ९ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सेवा केली, चरणसेवा सेवा उपक्रमाबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केल्याचे श्री. नाईक म्हणाले.

श्री. जंगम म्हणाले, 'निर्मल दिंडी' उपक्रमाअंतर्गत सुमारे ११ हजार शौचालय, १५५ हिरकणी कक्ष, स्तनदा माताकरिता हिरकणी कक्ष, सॅनिटरी नॅपकिन, नॅपकिन बर्निंग इन्सिनरेशन, लहान बालकांकरिता खेळणी वस्तू आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. स्वच्छतेच्या काम ाकरिता सुमारे १ हजार २३६ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे, असेही श्री. जगंम म्हणाले.

यावेळी श्री. फडणवीस यांच्या हस्ते स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले, तसेच निर्मल दिंडी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या वतीने पालखी सोहळ्यात राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाच्या यशस्वीतेकरिता काम केलेल्या अधिकारी, सेवाभावी संस्था, कार्यकर्त्यांचा तसेच आरोग्यवारी उपक्रमात उल्लेखनीय काम केलेल्या संस्थांचा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पंढरपूरचे उप विभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, विकास अधिकारी सु-शील संसारे आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमात 'निर्मल दिंडी', 'चरणसेवा' आणि 'आरोग्यवारी' उपक्रमाबाबत माहितीपट दाखविण्यात आले.

# एकत्र आलोय एकत्र राहण्यासाठी; उद्धव ठाकरे

मुंबई : बऱ्याच वर्षांनी राज आणि माझी भेट व्यासपीठावर झाली. पंचाईत अशी आहे, की त्याने मला सन्माननीय उद्धव ठाकरे असं म्हटलं आहे. साहजिकच आहे की त्याचंही कर्तृत्व आपण सर्वांनी पाहिलेलं आहे. म्हणून माझ्या भाषणाची सुरुवात सन्माननीय राज ठाकरे आणि जमलेल्या माझ्या म राठी हिंदू बांधवांनो आणि भगिनींनो.. अशी करतोय. वैयक्तिक मला वाटतं, की आमच्या भाषणापेक्षा आमचं एकत्रित दिसणं महत्त्वाचं आहे. ज्यांनी मराठी भाषेसाठी पक्षभेद विसरुन उपस्थिती लावली त्यांचे आभार, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाषणाला सुरुवात केली.



आम्हा दोघांमधला अंतरपाट अनाजीपंतांनी दूर केला. एकत्र आलोय एकत्र राहण्यासाठी. आज भोंदूबाबा-महाराज व्यस्त असतील, कोणी टाचण्या टोचतंय, कोणी अंगारे धुपारे करतंय, कोणी रेडे कापतंय, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. या नतद्रष्टांचा अनुभव घेतला, वापरायचं आणि फेकून द्यायचं. आता आम्ही दोघं मिळून तुम्हाला फेकून देणार आहोत, असा इशाराही उद्धव ठाकरेंनी दिला. डोक्यावर बाळासाहेबांचं छत्र नसतं तर काय केलं असतं? कोणत्या भाषेत बोलत होतात? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी विचारला.

राजने सगळ्यांची शाळा काढली, मला एक प्रश्न पडला आहे, नरेंद्र मोदी यांची शाळा कोणती? सगळ्यात उच्चशिक्षित आहेत. भाजप ही अफवांची फॅक्टरी आहे. मधल्या काळात यांनी सुरु केलं होतं, की उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं, पण हिंदुत्व ही कुठल्याही भाषेची मक्तेदारी नाही. आम्ही अस्सल मराठी बोलण-ारे तुमच्याहीपेक्षा जास्त कडवट, कट्टर देशाभिमानी हिंदू आहोत. तुम्ही काय आम्हाला हिंदुत्व शिकवणार? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी विचारला.

हिंदीसक्तीच्या विरोधातील निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने मागे घेतल्यानंतर मनसे आणि ठाकरेसेना यांच्याकडून वरळीत विजयी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. वरळी डोम परिसरात मनसे आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांची तुफान गर्दी झाली आहे. या सोहळ्याला रश्मी ठाकरे, तेजस ठाकरे, आदित्य ठाकरे, अमित ठाकरे, शर्मिला ठाकरे असे कुटुंबीय उपस्थित आहेत. याशिवाय संजय राऊत, सुभाष देसाई, अनिल देसाई, प्रियांका चतुर्वेदी, किशोरी पेडणेकर, संदीप देशपांडे, अविनाश जाधव आदी उपस्थित होते.

# पोलीस केस मागे घेण्याच्या कारणावरून मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) जोडभावी पेठ येथील कचरा डेपो जवळ निळ्या पत्र्याच्या खोलीजवळ फिर्यादी चांदणी विकास घाटगे यांना बोला-वून फिर्यादी यांच्या ओळखीचा प्रताप सिद्राम गायकवाड (रा.बॉबी चौक,न्यू बुधवार पेठ) याने तिला तू माझ्या लोकांविरुद्ध केलेली केस माघारी घे असे म्हणून शिवीगाळ करत हाताने मारहाण केली आहे. तसेच फिर्यादी चांदणी यांनी पोलीस केस माघारी घेणार नाही असे म्हणाल्या असता,प्रताप याने फिर्यादी यांना भीती घालण्यासाठी पिवळ्या रंगाचे फिनेल सारखे द्रव फिर्यादीस पाजले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.ही घटना ३० जून रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली.या घटनेचा पुढील तपास याप्रकरणी चांदणी घाटगे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून प्रताप गायकवाड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास सपोनि. गायकवाड हे करीत आहेत

।। झाडु संतांचे मार्ग ।। करु पंढरीचा स्वर्ग ।।

## पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

स्वच्छ भारत अभियान    स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)    स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा ६.०

### आषाढी यात्रा २०२५
### यात्रेकरूंना व भाविकांना नम्र आवाहन
### माझ्या विठ्ठलाची पवित्र पंढरी
### स्वच्छ, सुंदर, हरित ठेवण्याची माझ्यासह प्रत्येकाची जबाबदारी

पंढरपूर हे भूवैकुंठ नगरी आहे. या भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरूंचे हार्दिक स्वागत आहे. या नगरीचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

१) यात्रेकरू. दिंडीकरी, फडकरी, भाविक भक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर ६५ एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.

२) उघड्यावर शौचास बसु नये प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयाचा वापर करावा.

३) शौचालयात पुरेशा पाण्याचा वापर करावा.

४) पत्रावळी व द्रोणचा वापर :- जेवणाकरीता थर्माकोल, प्लॉस्टिकच्या पत्रावळी वापरू नये त्याऐवजी पर्यावरणपूरक विघटन होणाऱ्या पत्रावळ्यांचा, द्रोणचा वापर करावा व प्लॉस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा पर्यावरणाचा समतोल साधावा.

५) कचरा व्यवस्थापन :- आपल्या मठ/संस्था इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ. तीन टिपामध्ये ओला, सुका व घातक असा वेगवेगळा साठवून ठेवावा हे नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्ये द्यावा, रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकू नये.

६) नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये, नगरपरिषदेच्या नळाचे किंवा पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे पाणी प्यावे.

७) शिळे अन्न, नासकी फळे व उघड्यावरील पदार्थ खाऊ नये.

८) धोकादायक इमारतीमध्ये राहू नये.

९) पार्कींग व्यवस्था ठिकाणे :- भिमा बस स्टैंड मोहोळ रोड, ६५ एकर मागील बाजु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुल, अंबाबाई पटांगण, इसबावी विसावा पार्किंग, वेअर हाऊस पार्किंग, यमाई तुकाई पार्किंग, विडारी बंगला पार्किंग, गजानन महाराज मठ क्र. १. एलआयसी ऑफीस पार्किंग, सुलभ शौचालय पार्किंग, गाडगेबाबा चौक, भक्त निवास, तुळशी वृंदावन शेजारी. ५२ एकर पार्किंग, वाखरी, खादी ग्रामोद्योग, ६५ दिंडी परिसर वाहन, सखुबाई कन्या प्रशाला पार्किंग इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.

(श्री. सचिन इथापे)
प्रशासक
नगरपरिषद पंढरपूर

(श्री. महेश रोकडे)
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर